# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/ सा.प्र. /३६७ /2023-24 दि.०८ /२/2024

## आदेश

**सोमवार दि. 19 फेब्रुवारी 2024 रोजी छत्रपती शिवाजी महाराज** यांच्या जयंतीनिमित्त काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास सकाळी 09.00 वाजता व एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास सकाळी 09.30 वा. तदनंतर सकाळी 9.45 वा. महानगरपालिका मुख्य कार्यालयासमोर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम **मा.श्री.संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते आयोजित केला आहे.

तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे सकाळी ठिक 10.00 वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मा. श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) आयुक्त तथा प्रशासक यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमांकरीता खालील अधिकाऱ्यांचे निर्देशानुसार नेमुन दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमांचे कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचारी | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | श्री. दिपक खांबीत<br>शहर अभियंता (स्थापत्य.) | छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मुख्य कार्यालयाच्या इमारतीस रोषणाई करण्याची व्यवस्था, प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाची रंगरंगोटी करुन परिसरात सुशोभिकरण करणे तसेच काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच मुख्य कार्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील पुतळयांजवळ रोषणाई करण्यात यावी तसेच काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ एल ई डी स्क्रीनची व्यवस्था करावी. तसेच राज्यगीताचे वादन करण्याकरिता मनपा मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे साउंड सिस्टमची व्यवस्था करावी. |
| २. | श्री. प्रकाश बोराडे<br>प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी | उपरोक्त दिवशी व वेळी आपल्या अग्निशमन विभागाची हायड्रोलीक शीडी त्यांच्या चालकासह नमुद ठिकाणी न चुकता तयार ठेवावी. याबाबत संबंधित विभागाच्या अधिनस्त अधिका-यांना आदेश देवून कार्यवाही करावी. नियोजित कार्यक्रमामध्ये बाधा येणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री. हंसराज मेश्राम<br>प्र.उपमुख्य उदयान अधिक्षक, भाईंदर (प.) | एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा आणि आणि मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अधीकृती पुतळे धुवून साफ करावेत. तसेच आजू बाजूच्या परिसरात साफ सफाई करुन एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथे सकाळी 09.15 वाजता दोन मोठे पुष्पहार, दोन श्रीफळ घेडुन नचुकता उपस्थित रहावे. याबाबत लगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ४. | श्री. नागेश विरकर<br>प्र.उपमुख्य उदयान अधिक्षक, मिरा रोड | काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा धुवून साफ करावेत तसेच आजू बाजूच्या परिसरात साफ सफाई करुन काशिमिरा येथे सकाळी 08.45 वाजता दोन मोठे पुष्पहार, दोन श्रीफळ घेडून नचुकता उपस्थित रहावे. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ५. | श्रीम. सोनाली मातेकर<br>शिक्षणधिकारी, शिक्षण विभाग | राज्यगीत गायन व छोटेखानी सांस्कृतिक समारंभाचे आयोजन करणेकरिता शिक्षक व विदयार्थाची नेमणुक करण्यात यावी. सदर सदर कार्यक्रमा करीता मि.भा.मनपा मुख्य कार्यालयात न चुकता वेळेवर हजर रहावे. |
| ६. | श्री. राजकुमार घरत<br>जनसंपर्क अधिकारी | फोटोग्राफी करणेकरीता फोटोग्राफर उपलब्ध करणे व सदर कार्यक्रमाचे परिपत्रक मा. संपादक, पत्रकार,इ ना वाटप करण्याचे काम आपल्या विभागाकडून करण्यात यावे. तसेच परिपत्रक महानगरपालिकेच्या वेबसाईट तसेच नोटीस बोर्डावर प्रसिध्दी देणे. |

वरील प्रमाणे नमुद अधिकाऱ्यांनी सोपविलेले कामकाजांची जबाबदारी पार पाडावी.

**(मारूती गायकवाड)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**